# ध्येयशिखर.....

जीवनातील ध्येयाचे शिखर सर करीत असताना...
संकटांचे वारे वाहतील
अडथळयांच्या खाचखळग्यांतून वाटा चढावाच्या भासतील
बेरजा करु पहाल तर वजाबाक्या होतील
आणि जरा हसु पहाल तर डोळे ओले होतील
वाटेत दम लागला तर दम घ्या क्षणभर...
पण नका सोडू धीर...मित्रांनो!
रात्रीच्या गर्भातूनच होतो शेवटी उषःकाल
जगी कोण नाही असा जो पाही दिःकाल
वाटेल सूळका जरी दूरदूरवर
कोणास ठावूक पण असेल एका हातावर
चिकटून रहा ध्येयाशी मार्गक्रमण करताना
भय-शंकेची वटवाघुळे माथ्यावर भिरभिरताना...
अपयश हे अल्प-यश नसे शेवट जीवनाचा
वादळ-वाटांवरती दिवा जळू दे आशेचा...
आणि मग
भले कोसळू दे कडे संकटांचे निश्चल, अविचल उभे ठाका
आणि धीर मात्र सोडू नका, कारण असे केले तर
अंतिम विजय तुमचाच आहे!!!

